**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**शुक्रवार दिनांक १९ डिसेंबर २०२५**

**ठळक बातम्या**

1. **संसदेचं हिवाळी अधिवेशन संस्थगित/ लोकसभेत १११ टक्के, तर राज्यसभेत १२१ टक्के विधायक कामकाज.**
2. **योग प्रसार आणि विकासामध्ये उल्लेखनीय काम केलेल्या व्यक्तींचा पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या हस्ते सत्कार, जागतिक आरोग्य संघटनेच्या आंतरराष्ट्रीय शिखर परिषदेचा समारोप.**
3. **नागपूरच्या बुटीबोरी एमआयडीसीतील अवाडा कंपनीत बांधकाम सुरू असलेली टाकी फुटल्याने तीन कामगारांचा मृत्यू.**
4. **भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यातला पाचवा आणि शेवटचा टी-२० क्रिकेट सामना आज अहमदाबादमध्ये संध्याकाळी सात वाजता सुरु होणार.**

संसद संस्थागीत

संसदेच्या दोन्ही सभागृहांचं कामकाज आज अनिश्चित काळासाठी तहकूब झालं, लोकसभेत सभापती ओम बिरला यांनी सांगितलं की,

***माननीय सदस्यगण, अब हम 18 वीं लोकसभा के छठे सत्र की समाप्ति की और आगे है। इस सत्र में हमने 15 बैठक की आप सभी के सहयोग से इस सत्र में सभा की उत्पादकता 111% रही। सभा की कार्यवाही अनिश्चितकाल के लिए स्थगित की जाती है।***

या अधिवेशनात सभागृहाच्या १५ बैठका झाल्या आणि त्यात १११ टक्के विधायक कामकाज झालं. राज्यसभेत सभागृहाच्या कामकाजात वारंवार व्यत्यय येत असल्याबद्दल अध्यक्ष सी पी राधाकृष्णन यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. सदस्यांनी आत्मपरीक्षण करावं असं आवाहन त्यांनी केलं. सभागृहात ९२ तास प्रत्यक्ष कामकाज झालं असून १२१ टक्के उत्पादकता राहीली, असं उपराष्ट्रपतींनी सांगितलं. जी-रामजी विधेयकावरच्या चर्चेसाठी मध्यरात्रीपर्यंत सभागृहाचं कामकाज चालल्याचा उल्लेख त्यांनी केला. सभागृहाचे अध्यक्ष या नात्याने आपलं पहिलंच अधिवेशन होतं असं सांगून राधाकृष्णन यांनी उपाध्यक्ष, तालिका सदस्य, सभागृह

नेते, आणि विरोधी पक्ष नेते यांचे आभार मानले. १ डिसेंबर पासून सुरु झालेल्या या हिवाळी अधिवेशनात वंदे मातरम्, निवडणूक सुधारणा, रोजगार, विमा क्षेत्रातल्या सुधारणा तसंच ऊर्जा सुरक्षा यांसारख्या महत्त्वाच्या विषयांवर सखोल चर्चा झाली. या अधिवेशनात एकूण पाच महत्त्वाची विधेयकं मंजूर करण्यात आली. त्यात विकसित भारत रोजगार हमी उपजीविका विधेयक, शांती विधेयक, विमा सुधारणा विधेयक तसंच निरसन आणि सुधारणा विधेयकांचा समावेश आहे. दरम्यान, मनरेगा ऐवजी विबी जी-रामजी राबवण्याच्या विधेयका विरोधात विरोधीपक्षांच्या खासदारांनी आजही संसदभवन परिसरात निदर्शनं केली.

जागतिक आरोग्य संघटना आंतरराष्ट्रीय शिखर परिषदेचा समारोप

पारंपरिक औषधशास्त्रावर नवी दिल्लीत सुरू असलेल्या जागतिक आरोग्य संघटनेच्या आंतरराष्ट्रीय शिखर परिषदेचा आज भारत मंडपम इथं समारोप सोहळा होत आहे. या समारोप समारंभात प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते अनेक आयुष उपक्रमांचा प्रारंभ केला जाणार आहे. माय आयुष सर्वसमावेशक सेवा पोर्टल, आयुष मार्क या प्रमाणिकरणाचा यामधे समावेश आहे. या कार्यक्रमात२०२१ ते २०२५ या काळात योग प्रसार आणि विकासामध्ये उल्लेखनीय काम केलेल्या व्यक्तींना प्रधानमंत्र्यांच्या हस्ते पुरस्कार दिला जात आहे. त्यानंतर पंतप्रधान उपस्थितांना संबोधित करतील. तत्पूर्वी आयुष्य मंत्री प्रतापराव जाधव यांनी शिखर परिषदेत झालेल्या महत्वपूर्ण बाबींचा आढावा घेतला -

***पारंपरिक चिकित्सा अब वैश्विक स्वास्थ्य विमर्श के केंद्र में आ चुकी है। इस दौरान हमने कई महत्वपूर्ण विषयों पर गहन चर्चा की जिनमें मुख्य रूप से एविडेंस, बेस्ट रिसर्च को मजबूत करना, क्वालिटी सुरक्षा और एथिकल स्टैंडर्ड को पक्का करना रेग्युलेटरी और पॉलिसी फ्रेमवर्क को ऑर्गनाइज्ड करना और ट्रेडिशनल मेडिसिन को मॉडर्न हेल्थ केयर सिस्टम के साथ जिम्मेदारी से जोड़ना अधि सम्मिलित है।***

या कार्यक्रमाला जागतिक आरोग्य संघटनेचे महासंचालक टेड्रोस अधनोम घेब्रेसस, आरोग्य आणि कुटुंब कल्याण जगत प्रकाश नड्डा यांची प्रमुख उपस्थिती आहे.

उद्या मतदान

न्यायालयीन प्रक्रियेमुळे निवडणुका लांबलेल्या राज्यातल्या नगरपरिषदा आणि नगरपंचायतींमध्ये उद्या मतदान होणार आहे. २४ अध्यक्षपदं आणि विविध ठिकाणच्या १५४ सदस्य पदांसाठी हे मतदान होईल.  या मध्ये विदर्भातील अमरावती, वर्धा आणि चंद्रपूर जिल्ह्यातील नगरपरिषदा आणि नगरपंचायतींचा समावेश आहे. राज्यातल्या सर्व २४३ नगरपरिषदा आणि ४२ नगरपंचायतींच्या निवडणुकीची मतमोजणी परवा २१ तारखेला होणार आहे.

बावनकुळे

वाशीम नगरपरिषद निवडणुकीच्या प्रचाराच्या शेवटच्या दिवशी भाजप नेते  चंद्रशेखर बावनकुळे यांची जाहीर सभा झाली. नगराध्यक्ष पदाचे उमेदवार अनिल केंदळे यांच्या प्रचारासाठी आयोजित सभेत बावनकुळे यांनी वाशीमच्या सर्वांगीण विकासासाठी भाजपच्या सर्व उमेदवारांना विजयी करण्याचे आवाहन केले.दरम्यान, वाशिम नगर परिषदेच्या निवडणुकीसाठी उद्या मतदान प्रक्रिया पार पडणार असून, आज EVM मशीन व मतदान साहित्याची तपासणी करून ते पोलीस बंदोबस्तात मतदान केंद्रांकडे रवाना करण्यात आले आहेत. जिल्हा प्रशासनाच्या वतीने निवडणुकीची सर्व तयारी पूर्ण करण्यात आली आहे.

अमरावती महानगरपालिका

अमरावती महानगरपालिका निवडणूक २०२५-२०२६ च्या पार्श्वभूमीवर निवडणूक तयारी व अंमलबजावणीबाबत निवडणूक अधिकारी तथा आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांच्या अध्यक्षतेखाली राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींशी महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. या बैठकीत आदर्श आचारसंहिता, प्रचार नियम, खर्च मर्यादा व शांततापूर्ण, निष्पक्ष निवडणूक प्रक्रिया राबविण्याबाबत चर्चा करण्यात आली.

हिंदू वर्ल्ड इकॉनॉमिक फोरम

प्राचीन भारत हा जगातील सर्वाधिक प्रगत आणि आर्थिक महासत्ता असणारा देश होता. भारतातील ज्ञान, परंपरा आणि संस्कृतीमुळे देश जगात आघाडीवर होता. या प्राचीन ज्ञानाची आजच्या आधुनिक तंत्रज्ञानाशी प्रभावी सांगड घातल्यास भारत पुन्हा एकदा ‘विश्वगुरू’ होऊ शकतो, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला. वांद्रे-कुर्ला संकुलातील ग्रँड हयात येथे हिंदू वर्ल्ड इकॉनॉमिक फोरमच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते.

आंतरराष्ट्रीय व्याख्यानमाला

दलितांना जी वागणूक मिळत होता ती माणूसकीची नव्हती दलित महिलांना तर अजूनही खालची वागणूक मिळत असे, पण डॉ.आंबेडकरांनी या वंचिताचा स्वाभिमानाचा लढा उभा करत माणूसकी स्थापित केली आणि महिलांच्या स्वावलंबन सक्षमीकरणासाठी शिक्षणाच महत्व अधोरेखित केले, असे प्रतिपादन 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर, बौद्ध धम्म आणि भारतातील मानवतेचा प्रश्न' या विषयावर अमेरिकेच्या सिनसिनाटी विद्यापीठातील मॅक आर्थर फेलो, डॉ.शैलजा पाईक यांनी केले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या वतीने डॉ. नितीन राऊत आंतरराष्ट्रीय व्याख्यानमाले अंतर्गत आज त्या संबोधित करत होत्या. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान कुलगुरू डॉ.मनाली क्षीरसागर होत्या.

अपघात

नागपूरच्या बुटीबोरी एमआयडीसी फेज-2 येथील अवाडा सोलर प्लांटमध्ये आज, सकाळी प्लांट परिसरातील पाण्याची मोठी टाकी अचानक फुटल्याने 3 कामगारांचा जागीच मृत्यू झाला असून 8 जण गंभीर जखमी झाले आहेत. जखमींमध्ये काहींची अवस्था चिंताजनक असल्याची माहिती आहे, आणि जखमींची संख्या वाढण्याची शक्यता वर्तवली जात आहे. घटनेची माहिती मिळताच स्थानिक पोलीस, अग्निशमन दल आणि आपत्कालीन सेवा घटनास्थळी दाखल झाले. या दुर्घटने बाबत माहिती पोलिस अधिक्षक डॉ.हर्ष पोद्दार यांनी दिली.

***सध्याची जे इन्फॉरमेशन आहे तीन लोकांचे मृत्यू झाले आहेत तीन लोक क्रिटिकली इन्जुअर्ड आय.सी.यु.ला आहेत. मेयो हॉस्पिटलला आणि चार लोक जे आहेत त्यांना किरकोळ जखमी झाले आहेत. फॅक्टरीमध्ये एक मोठा मॉड्युलर टॅन्क आहे ते वॉटर टँक आहे. वॉटर टँकची कॅपॅसिटी सुमारास 150 किलो लिटर्स आहे. ते जे टॅन्क आहे ते ब्लास्ट झाला आणि ब्लास्टमुळे जे आहे ते केज्युअलिटीज झाले आहेत चौकशी जे आहे ते सुरु आहे. आतापर्यंत आम्ही काही निष्कर्ष वर पोहोचले नाहीत चौकशी पूर्ण होईल.***

त्यानंतर आम्ही डिसाइड करू की काय कारवाई होईल. मृत कामगारांचे मृतदेह ताब्यात घेऊन शवविच्छेदनासाठी पाठवण्यात आले आहेत. मृतांमध्ये बिहारच्या मुजफ्फरपुर आणि चंपारणचे कामगार असल्याची माहिती आहे

हिवाळी लेखी परीक्षा

नागपूर महानगरपालिकेच्या निवडणुकांमुळे आगामी जानेवारी महिन्यात होणाऱ्या हिवाळी लेखी परीक्षांचे पेपर रद्द करण्यात येत असल्याची माहिती नागपूर विद्यापीठाच्या परीक्षा विभागातर्फे देण्यात आली आहे. यानुसार 14 जानेवारी 15 जानेवारी आणि 16 जानेवारी रोजी नियोजित परीक्षांचे पेपर रद्द करण्यात आले असून, याचे नवीन वेळापत्रक विद्यापीठाच्या संकेत स्थळावर उपलब्ध करून देण्यात आले आहे. त्यामुळे नवीन वेळापत्रकाची नोंद परीक्षा केंद्रप्रमुख, प्राचार्य आणि सर्व संबंधित विद्यार्थ्यांनी घ्यावी, असं आवाहन करण्यात आलं आहे.

टी-२० क्रिकेट

भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यातला पाचवा आणि शेवटचा टी-२० क्रिकेट सामना आज अहमदाबादमध्ये नरेंद्र मोदी स्टेडियमवर होणार आहे. सामना संध्याकाळी सात वाजता सुरू होईल. सूर्यकुमार यादवच्या नेतृत्वाखाली भारतीय संघ २-१ नं आघाडीवर आहे. बुधवारी लखनौच्या एकाना स्टेडियमवर झालेला चौथा टी-२० सामना धुक्यामुळे रद्द करण्यात आला होता

हवामान

देशाच्या उत्तर भागात थंडीचा जोर असून धुक्याचा दाट थर पसरला आहे. उत्तर प्रदेश आणि हरियाणामध्ये आजपासून २१ डिसेंबरपर्यंत सकाळी आणि रात्री दाट ते अतिदाट धुक्याची शक्यता आहे. पंजाब, उत्तराखंड, हिमाचल प्रदेश, ओडिशा आणि झारखंडमध्येही हीच स्थिती कायम राहील असा अंदाज आहे. दरम्यान, विदर्भात देखील थंडीचा जोर कायम आहे आज विदर्भात गोंदिया इथ सर्वात कमी किमान तापमान ८ अंश सेल्सिअस इतकं नोंदविण्यात आल. नागपुरात ८.५ अंश सेल्सिअस इतक्या किमान तापमानाची नोंद झाली.

*****